दैनिक
# लोकांकीत
सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र
मुख्य संपादक-संजय पवार

## मी मंत्रिपदासाठी दिल्लीला गेलो नव्हतो!

**मुंबई**–भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आपल्या दिल्ली दौऱ्याबाबत सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम देत, आपण मंत्रिमंडळ विस्तार किंवा मंत्रिपदासाठी दिल्लीला गेलेलो नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्याचवेळी त्यांनी INDIA आघाडीच्या नेतृत्वाच्या प्रश्नावर भाष्य करत उद्धव ठाकरे यांच्या भूमिकेवरही प्रतिक्रिया दिली.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग १२ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केल्याच्या पार्श्वभूमीवर मुनगंटीवार म्हणाले की, हा देशासाठी महत्त्वाचा आणि अभिमानाचा क्षण आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या विक्रमापेक्षा अधिक काळ पंतप्रधान म्हणून सेवा देण्याची संधी मोदींना मिळाली असून, जनतेने त्यांच्या नेतृत्वावर सातत्याने विश्वास दाखवला आहे, असे त्यांनी सांगितले.

• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/7448 • बुधवार दि.१० जून २०२६ • अंक-१३० • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.

# राष्ट्रवादी प्रवेशाच्या चर्चांना नवनीत राणांचा पूर्णविराम

## मी भाजपची निष्ठावान कार्यकर्ता, विचारधारेशी तडजोड नाही

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करून राज्यसभेवर जाणार असल्याच्या चर्चांना खासदार नवनीत राणा यांनी अखेर पूर्णविराम दिला आहे. कोणत्याही पदासाठी आपली विचारधारा बदलणार नाही आणि भारतीय जनता पक्षाची निष्ठावान कार्यकर्ता म्हणूनच काम करत राहणार असल्याचे स्पष्ट करत त्यांनी पक्षांतराच्या सर्व शक्यतांना फेटाळून लावले. राज्यसभा उमेदवारीसंदर्भातील पडद्यामागील घडामोडींवरही त्यांनी प्रथमच भाष्य केले.

सोशल मीडियावर पोस्ट करत नवनीत राणा यांनी राज्यसभा उमेदवारीबाबत सुरू असलेल्या चर्चांवर भाष्य केले. आदरणीय सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पार्थ पवार यांनी मला राज्यसभेवर पाठवण्याची इच्छा व्यक्त केली होती. मात्र, त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याची अट मला मान्य नव्हती, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत पक्षांतराचा प्रश्नच उद्भवत नसल्याचे त्या म्हणाल्या.नवनीत राणा यांनी पुढे सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार त्यांनी सुनेत्रा पवार यांची प्रत्यक्ष भेट घेत राष्ट्रवादी काँग्रेसची राज्यसभेची जागा भाजपसाठी सोडण्याची विनंती केली होती. मात्र काही कारणांमुळे ते शक्य झाले नाही. तरीही माझ्यावर विश्वास ठेवून राज्यसभेसाठी संधी देण्याचा विचार केल्याबद्दल सुनेत्रा पवार, अजित पवार आणि पार्थ पवार यांची मी ऋणी असल्याचे त्यांनी म्हटले.दरम्यान, नवनीत राणा यांच्या या भूमिकेमुळे त्यांच्या राष्ट्रवादी प्रवेशाच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला असून त्या आगामी काळात भाजपमध्येच सक्रिय राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यांच्या या स्पष्टीकरणानंतर राजकीय वर्तुळातील विविध तर्क-वितर्कांनाही विराम मिळाल्याचे मानले जात आहे.



# सानपाडा विभागात महावितरणच्या अधिकारी व ग्राहक नागरिक बैठक संपन्न

## उपमहापौर दशरथ भगत यांनी केली MSEDCच्या अधिकाऱ्यांना दिल्या सूचना



**मुंबई । प्रतिनिधी**

एप्रिल -मे महिन्यात नेहमी विजेची वाढती नागणी असते. यंदाचा उन्हाळा असह्य झाला आहे त्यात वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिक वैतागले आहेत. महावितरणच्या भोंगळ कारभाराबाबत उपमहापौर दशरथ भगत यांनी पुढाकार घेऊन वीज वितरण अधिकारी व सानपाडा विभागातील ग्राहक यांची संयुक्त बैठक सोमवार रोजी सायंकाळी सानपाडा गाव येथे घेण्यात आली.सदर बैठकीत नागरिकांना सुरळीत वीज पुरवठा करण्यात यावा, दुरावस्थेत असलेल्या केबल्स दुरुस्त कराव्यात किंवा बदलाव्यात, वीज खंडीत झाल्यास पुरवठा पूर्ववत करण्यासाठी योग्य साधन सामुग्री, मनुष्यबळ उपलब्ध असावे. सानपाडा गावातील व परिसरातील डीपी, सबस्टेशन्स यांची योग्य ती दुरुस्ती करण्यात यावी. असे निर्देश दशरथ भगत यांनी उपस्थित अधिकारी सहाय्यक अभियंता गौतम सूर्यवंशी, रोशन बॅनर्जी यांना दिले.उन्हाळ्यातील वाढती वीज मागणी व आगामी मान्सून लक्षात घेवून महावितरणने नियोजनबद्ध आखणी करून वीज ग्राहकांना पुरेसा अखंडित विद्युत पुरवठा देण्यात यावा. तापमान बदलामुळे यंदा गर्मी जास्त वाढल्याने वीज पुरवठा कमीतकमी खंडीत होईल याची काळजी घ्यावी. असेही दशरथ भगत यांनी सांगितले. यावेळी नगरसेविका शिल्पा राजेश ठाकूर, माजी नगरसेविका सुनंदा पाटील, समाजसेवक जगदीश पाटील, भालचंद्र पाटील, राजेश ठाकूर, दत्त मंदिर ट्रस्ट अध्यक्ष सदानंद पाटील, युवा समाजसेवक अर्जुन नाईक, ग्रामस्थ व प्रभागातील महिला, नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. ह्या बैठकीचे यशस्वी आयोजन प्रभाग १९ नगरसेविका व 'क' प्रभाग सभापती शैला जगदीश पाटील यांनी केले होते.

# कळंबोलीतील सततच्या वीज खंडित प्रकारामुळे नागरिक त्रस्त, संतप्त नागरिकांची मध्यरात्री महावितरण कार्यालयावर धडक;पोलिसाने परिस्थिती नियंत्रणात आणली

**पनवेल । प्रतिनिधी**

कळंबोली शहरातील खंडित वीज समस्या गंभीर बनली आहे. वारंवार विजेच्या लपंडाव यामुळे नागरिकांत तीव्र नाराजी आहे. सतत रात्रीच्या चार दिवस वीज खंडित प्रकारामुळे नागरिकांचा उद्रेक उफाळून येऊन त्यांनी रात्री १२ वाजता महावितरण कंपनीवर चाल करून कार्यालयात घुसण्याचा प्रयत्न केला पण अनुचित प्रकार घडण्यापूर्वी पोलिसाने वितरण कार्यालयाला संरक्षण दिले. त्यामुळे नागरिकांचा नाईलाज होऊन त्यांना आपला संताप आवरता घ्यावा लागला. आणि अनुचित प्रकार टाळला.



कळंबोली शहरतील वारंवार होणाऱ्या वीज खंडित प्रकारामुळे नागरीक हैराण आहेत. वाढत्या उष्मामुळे अंगाची लाहीलाही होत असून नागरिकांना उकाड्याने जिणे नकोसे झाले असताना वितरण अधिकारी सुस्त बनले आहेत. निर्लज्जपणाचा कळस गाठला आहे. अधिकारी बिनधास्त वितरण कंपनीचा पगार घेत मजा मारत आहेत. तर दुसरीकडे सतत मध्यरात्री नंतर वीज पुरवठा खंडित होत असल्याने कळंबोलीकरांची झोप हिरावून घेतली आहे. महावितरण कंपनीच्या दिशाहीन कारभारामुळे नालायक अधिकाऱ्यांमुळे व्यावसायिकांचे आणि विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे. सततच्या वीज खंडित प्रकारामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांचा उद्रेक उफाळून येऊन त्यांनी काल ( दि ८ ) रात्री १२ वाजता कळंबोली महावितरण कार्यालयावर धडक देऊन कार्यालयात घुसण्याचा प्रयत्न केले पण पण वेळीच कार्यालयाला पोलिसांचे संरक्षण मिळाले म्हणून अनुचित प्रकार टाळला. असेच वीज खंडित होण्याचे प्रकार होत राहिले तर अधिकाऱ्यांना पळती भुई थोडी होणार आहे. तेव्हा अधिकाऱ्यांनी आपण घेत असलेल्या पगाराची लाज ठेवून काही प्रमाणात आपले कर्तव्य बजाववे असे तंबी नागरिकांनी दिली.

या कार्यालयाचे विशेष म्हणजे विद्युत पुरवठा खंडित झाला की कार्यालयाचा दूरध्वनी त्वरित बंद करण्यात येत असा दांडगा अनुभव कळंबोली करांना आहे . याची त्यांची तक्रारही करण्यात आल्या आहेत. असा कर्मचाऱ्यावर कडक कारवाई करून त्याला सेवेतून आराम द्यावा. म्हणजे त्याला काम करण्याची कटकट राहणार नाही असा सल्लाही कलबोली नागरिकांनी दिला आहे. अनेक वेळा वीजपुरवठा खंडित होत असून सुद्धा आणि याबाबत तक्रारी करूनही कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात येत नाही ही शोकांतिका आहे. येथील अधिकारी फक्त खुची उबवून कंपनीचा पैसा लाटत आहेत. आपला फोन एयर मोड वर ठेवून जनतेची मजा घेत आहेत. वीज पुरवठा खंडित झाला की त्याचा फोन कवरेज एरियात जातो अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक देत आहेत. सततच्या वीज समस्येमुळे कळंबोलीकरांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण असून, लवकरात लवकर परिस्थिती सुधारली नाही तर तीव्र आंदोलन उभारण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे. आणि त्यातून उद्धवणाऱ्या परिस्थितीला महावितरण कर्मचारी जबाबदार असेल.

# तहसीलदार साहेब,लाखो रुपये खर्चून उभारलेले तलाठी कार्यालय बंद का?

## नागरिकांचा संतप्त सवाल; प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे जनतेची फरफट

**वडवणी तालुक्यात १८ तलाठी सज्जे असून सदरील सज्जाच्या गावी तलाठ्यांनी दररोज उपस्थित राहून महसुली कामे करावी असे सूचना देण्यात आलेले आहेत तसेच सदरील तलाठी कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आलेले आहेत परंतु सदरील इमारती आणखी प्रत्यक्ष आमच्या ताब्यात देण्यात आलेल्या नाहीत जेव्हा आम्हाला इमारतीचा ताबा मिळेल तेव्हा आम्ही तलाठी कार्यालय सुरू करू. सदरील तलाठी सज्जाचे इमारती गेल्या अनेक वर्षापासून बेवारस अवस्थेत बंद पडलेल्या असून इमारती दुरावस्था, नादुरुस्त झालेल्या असून पडण्याच्या मार्गावर असताना तहसीलदार वैभव महेंद्रकर यांनी मात्र आजबच माहिती दिली आहे.**




**वडवणी तालुक्यात कोट्यवधी रुपये खर्च करून सुसज्ज असे तलाठी कार्यालय उभारण्यात आले आहेत . मात्र दुर्दैवाने हे कार्यालय पूर्णपणे रिकामे असून नागरिकांना मूलभूत महसूल सेवांसाठी दारोदारी हेलपाटे मारावे लागत आहेत. विशेष म्हणजे तलाठी कार्यालय बंद असतानाही तलाठ्यांचा खाजगी दरबार मात्र वडवणीतील भागात दररोज भरत असल्याचा गंभीर बाब उघडकीस आली आहे.**

**राज्य शासनाचा स्पष्ट आदेश आहे की तलाठी, शिक्षक अथवा कोणताही सरकारी कर्मचारी ज्या गावात नेमणूक आहे, त्या गावातच वास्तव्यास असणे बंधनकारक आहे. मात्र या आदेशाला केराची टोपली दाखवत तलाठी तालुक्याच्या ठिकाणी बसून काम करत असल्याचे वास्तव समोर आले आहे. परिणामी, शेतकऱ्यांना, सामान्य नागरिकांना दाखले, जमिनीचे फेरफार, सातबारा, उत्पन्न प्रमाणपत्र यांसारख्या महत्त्वाच्या कामांसाठी प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे.**

**तलाठी कार्यालय उघडे नसल्याने नागरिकांना वारंवार खाजगी ठिकाणी जावे लागत असून यात वेळ, पैसा आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. सरकारी जागे ऐवजी खाजगी ठिकाणी दरबार भरवणे म्हणजे भ्रष्टाचाराला थेट खतपाणी घालण्यासारखे प्रकार असल्याचे बोलले जात आहे.**

**शंकर जाधव । वडवणी**

वडवणी तालुक्यात शासनाच्या लाखो रुपयांच्या निधीतून उभारण्यात आलेले १८ तलाठी कार्यालय सध्या कुलूपबंद अवस्थेत पडून असून नागरिकांना महसुली कामांसाठी आजही तालुक्याच्या गावी हेलपाटे मारावे लागत आहेत. त्यामुळे तहसीलदार साहेब, हे कार्यालय नागरिकांसाठी उभारले की फक्त कागदोपत्री विकास दाखवण्यासाठी? असा संतप्त सवाल आता ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

शासनाने ग्रामीण भागातील शेतकरी, विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना, निराधारांना गावपातळीवर सुविधा मिळाव्यात म्हणून लाखो रुपये खर्च करून स्वतंत्र कार्यालय उभारले. मात्र प्रत्यक्षात कार्यालय बंद असल्याने सातबारा, फेरफार, पीक नोंदी, उत्पन्न दाखले, निवासी दाखले यांसाठी नागरिकांना तालुक्याच्या ठिकाणी पायपीट करावी लागत आहे. नागरिक त्रस्त आहेत, पण प्रशासन मात्र झोपेत असल्याचा आरोप होत आहे. सध्या शेतकऱ्यांच्या लागवडीचा खरीप हंगाम सुरू झालेला असून शेतकऱ्यांना कागदपत्रासाठी तलाठी महोदयांना तालुक्याच्या ठिकाणी वडवणी येथे येऊन सापडण्याची वेळ येत आहे. मात्र तलाठी हे वडवणी येथून खाजगी किरायाच्या रूममधून कारभार करत आहेत. व तेथे हि ते सापडत नाही . त्यामुळे तलाठी सज्जाचे गावी लाखो रुपयांची इमारती धूळ खात पडल्या असून परिसरात अस्वच्छता आणि निष्क्रियतेचे चित्र पाहायला मिळत आहे. जनतेच्या कराच्या पैशातून उभारलेल्या इमारतीला कुलूप ठोकून प्रशासन नेमका कोणता विकास दाखवत आहे? असा सवाल संतप्त नागरिक विचारत आहेत.

तहसीलदारांना या बंद कार्यालयाची माहिती नाही का? जर माहिती असेल तर कारवाई का होत नाही? नागरिकांची गैरसोय होत असताना संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अभय कोण देत आहे? असे अनेक प्रश्न आता उभे राहत आहेत. महसूल विभागातील निष्काळजीपणामुळे शासन निधीचा उघडपणे अपव्यय होत असल्याची चर्चा तालुक्यात रंगू लागली आहे.

दरम्यान, या गंभीर प्रकाराची जिल्हाधिकारी यांनी तात्काळ दखल घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अन्यथा नागरिक तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. कार्यालय बंद ठेवून जनतेला वेठीस धरणाऱ्यांवर गुन्हे दाखल होणार का? याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# विकसित भारत-२०४७ चे स्वप्न साकार करण्यासाठी जागरूक समाज आणि उत्तरदायी लोकप्रतिनिधींची भूमिका महत्त्वपूर्ण-सभापती प्रा.राम शिंदे

## सीपीए भारत विभाग झोन-२ परिषदेत विकसित भारत राष्ट्रीय संकल्पासंदर्भात विचारमंथन

**हरियाणा । प्रतिनिधी**

विकसित भारत-२०४७ हे केवळ शासनाचे ध्येय नसून संपूर्ण राष्ट्राचा सामूहिक संकल्प आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जागरूक समाज, सक्षम लोकशाही संस्था आणि उत्तरदायी लोकप्रतिनिधी यांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले.सीपीए भारत विभाग झोन-२ परिषदेत विकसित भारत-२०४७ चे उद्दिष्ट साकारण्यात जागरूक समाज आणि लोकप्रतिनिधींची भूमिका आणि भविष्यातील आव्हाने या विषयावर ते बोलत होते. हरियाणा विधानसभा यांच्या वतीने चंदीगड येथे दिनांक ७ ते १० जून २०२६ या कालावधीत आयोजित या परिषदेस लोकसभा अध्यक्ष श्री. ओम बिर्ला, राज्यसभेचे उपसभापती श्री. हरिवंश, हरियाणा विधानसभा अध्यक्ष श्री. हरविंदर कल्याण, पंजाब, दिल्ली, हिमाचल प्रदेश आणि जम्मू-काश्मीर येथील पीठासीन अधिकारी तसेच विविध राज्य विधानमंडळांचे पीठासीन अधिकारी, सदस्य उपस्थित आहेत.सभापती प्रा. राम शिंदे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, लोकशाहीची खरी ताकद केवळ मतदान प्रक्रियेत नसून संवाद, चर्चा आणि विधायक विचारमंथनात आहे. संसद आणि विधानमंडळांमधील सशक्त चर्चा, विधायक वादविवाद आणि लोकहिताच्या दृष्टीने घेतले जाणारे निर्णय हे लोकशाहीचे प्राणतत्त्व आहे. संवाद जीवंत राहिला तर लोकशाही सशक्त राहते आणि विचारमंथन समृद्ध झाले तर राष्ट्र अधिक सक्षम बनते. लोकसभा अध्यक्ष श्री. ओम बिर्ला यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या झोन (विभाग) स्तरिय परिषदांची संकल्पना ही दूरदृष्टीपूर्ण आणि लोकशाहीला नवी ऊर्जा देणारी असल्याचे सांगत त्यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. विविध राज्यांच्या विधानमंडळांतील सर्वोत्तम संसदीय परंपरा, अनुभव आणि नवकल्पनांच्या आदान-प्रदानातून भारतीय संसदीय लोकशाही अधिक प्रभावी होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या संकल्पनेतील विकसित भारत-२०४७ या राष्ट्रीय उद्दीष्ट्याचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, सन २०४७ हे वर्ष स्वातंत्र्याच्या शताब्दीचे प्रतीक आहेच आणि त्याबरोबर भारताच्या भावी वाटचालीचे दिशा-निर्देशक वर्ष देखील आहे. गरिबीमुक्त, ज्ञानाधिष्ठित, तंत्रज्ञानसंपन्न, सांस्कृतिकदृष्ट्या आत्मविश्वासपूर्ण आणि जागतिक नेतृत्व करणारा भारत घडविण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने योगदान देणे आवश्यक आहे. यावेळी त्यांनी लोकप्रतिनिधींच्या जबाबदारीवर विशेष भर देत सांगितले की, जनप्रतिनिधी हे केवळ कायदे करणारे नसून समाजाच्या अपेक्षा आणि आकांक्षांचे प्रतिनिधित्व करणारे घटक आहेत. जनतेचा विश्वास संपादन करत विकासाभिमुख निर्णय प्रक्रिया प्रभावीपणे राबविणे ही त्यांची महत्त्वाची जबाबदारी



आहे. त्यामुळे विकसित भारताच्या प्रवासात विधानमंडळांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण राहणार आहे.हरियाणाच्या पवित्र भूमीचा उल्लेख करताना त्यांनी कुरुक्षेत्र आणि श्रीमद्भगवद्गीतेच्या संदेशाची आठवण करून दिली. कर्तव्य, नेतृत्व, लोककल्याण आणि राष्ट्रहित यांचा संदेश देणारी गीता आजही विकसित भारताच्या संकल्पासाठी मार्गदर्शक आहे, असे त्यांनी सांगितले. समाज आपल्या कर्तव्यांप्रति जागरूक राहिला आणि लोकप्रतिनिधी संविधानिक जबाबदाऱ्यांप्रति कटिबद्ध राहिले तर विकसित भारताचे स्वप्न निश्चितपणे साकार होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.भारत आज जगातील सर्वात मोठी लोकशाही, सर्वाधिक युवा शक्ती असलेला देश आणि वेगाने प्रगती करणारी अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत असल्याचे नमूद करत त्यांनी लोकशाही संस्कृती अधिक सुदृढ करण्याचे आवाहन केले. मतभेद असावेत, मात्र मनभेद नसावेत; स्पर्धा असावी, पण कटुता नसावी; विरोध असावा, परंतु वैमनस्य नसावे आणि राजकारणापेक्षा राष्ट्रनीती सर्वोच्च असावी, अशी भूमिका त्यांनी मांडली. विकसित भारताच्या उद्दिष्टपूर्तीसाठी लोकप्रतिनिधींनी सभागृहाच्या कामकाजात विधायक भूमिका बजावणे आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी फोर-डी (Four-D) संकल्पना मांडली. Debate, Discussion, Decide आणि Do Not Disturb ही लोकशाही बळकट करणारी चार महत्त्वाची तत्त्वे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सभागृहाची प्रतिष्ठा, दर्जेदार चर्चा, विधायक सूचना आणि जनहिताचे निर्णय हीच लोकशाहीची खरी ताकद असल्याचे त्यांनी नमूद केले.ही परिषद केवळ चर्चेपुरती मर्यादित न राहता विकसित भारत-२०४७ च्या राष्ट्रीय संकल्पाला नवी दिशा आणि नवी ऊर्जा देईल, असा विश्वास व्यक्त करत सर्वांनी लोकशाही मूल्ये, संसदीय परंपरा आणि जनविश्वास अधिक बळकट करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन आपल्या भाषणात सभापती प्रा. राम शिंदे यांनी शेवटी केले.

# पीएम इंडिया: बेकायदेशीर तंबाखू नेटवर्क रोखण्यासाठी कडक अंमलबजावणी व सहकार्याची गरज

**नवी मुंबई (चंद्रशेखर हेंडवे)**

फिलिप मॉरिस इंडिया ($PM^2$ इंडिया) ने बेकायदेशीर तंबाखू नेटवर्क मोडून काढण्यासाठी कडक अंमलबजावणी आणि उद्योग-अंमलबजावणी यंत्रणांमधील अधिक सहकार्याची गरज अधोरेखित केली आहे. तंबाखू इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (TII) च्या माहितीनुसार, भारतात बेकायदेशीर सिगारेट्सचा वाटा जवळपास एक-चतुर्थांश असून त्यामुळे सरकारला दरवर्षी सुमारे २३ हजार कोटी रुपयांच्या महसुलाचे नुकसान होत आहे.पीएम इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक नवनील कर म्हणाले, बेकायदेशीर तंबाखू व्यापार सतत प्रमाण आणि गुंतागुंत वाढवत आहे, ज्यामुळे सरकारी महसूल, ग्राहक सुरक्षा आणि नियामक व्यवस्थेवर गंभीर परिणाम होत आहेत. या समस्येवर प्रभावीपणे मात करण्यासाठी उद्योग आणि अंमलबजावणी संस्था यांच्यात मजबूत सहकार्य आवश्यक आहे. तसेच ट्रॅक-अँड-ट्रेससारख्या प्रणालींनी पुरवठा साखळीतील पारदर्शकता वाढविणे गरजेचे आहे.बेकायदेशीर तंबाखू व्यापार ही वाढती जागतिक समस्या बनली असून सीमापार तस्करीमुळे सरकारच्या महसुलाला मोठा फटका बसत आहे. ही समस्या आता केवळ सिगारेट्सपुरती मर्यादित नसून बंदी घालण्यात आलेल्या ई-सिगारेट्स आणि व्हेप्ससारख्या अनियंत्रित उत्पादनांचाही त्यामध्ये समावेश झाला आहे.

ईयू-आसियान बिझनेस कौन्सिल (EU-ABC) आणि युरोमॉनिटर इंटरनॅशनल यांच्या अहवालानुसार, -डए-छ-६ देशांमधील बेकायदेशीर तंबाखू बाजाराने २०२४-२५ या कालावधीत सुमारे १२.६ अब्ज अमेरिकी डॉलरचा महसूल निर्माण केला आहे. गेल्या वर्षात बेकायदेशीर सिगारेट विक्रीत १४ टक्के तर बेकायदेशीर ई-व्हेप विक्रीत २४ टक्के वाढ झाली आहे. अपिरासोलच्या एप्रिल २०२६ मधील अहवालानुसार, बेकायदेशीर ई-सिगारेट व्यापार वेगाने वाढत असून २०२४ मध्ये या बाजाराचे मूल्य ४७ अब्ज अमेरिकी डॉलर होते. हे जागतिक खर्चाच्या ७० टक्क्यांहून अधिक असून एकूण खपाच्या जवळपास तीन-चतुर्थांश इतके आहे.दरम्यान, भारतातही अंमलबजावणी यंत्रणांनी मोठ्या प्रमाणात कारवाया केल्या आहेत. डायरेक्टरेट ऑफ रेव्हेन्यू इंटेलिजन्स (DRI) ने देशव्यापी कारवाईत सुमारे ३ लाख प्रतिबंधित ई-सिगारेट्स आणि व्हेपिंग उपकरणे जप्त केली असून त्यांची किंमत १२० कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याचे सांगितले जाते. तसेच कोलकाता, गुवाहाटी, कोयंबतूर आणि चंदीगडसह विविध शहरांमध्ये लाखो बेकायदेशीर सिगारेट स्टिक्स जप्त करण्यात आल्या आहेत. तज्ज्ञांच्या मते, भारतासारख्या मोठ्या तंबाखू बाजारपेठेत बेकायदेशीर व्यापारावर नियंत्रण मिळविण्यासाठी सातत्यपूर्ण अंमलबजावणी, गुप्तचर-आधारित कारवाया आणि उद्योग-सरकार यांच्यातील समन्वय अधिक मजबूत करणे आवश्यक आहे.

## कोंडीवरे जुन्या वादातून एकाला बेदम मारहाण; ६ जणांवर गुन्हा दाखल

**संगमेश्वर । प्रतिनिधी**

कोंडीवरे (खान मोहल्ला) येथील एका ५० वर्षीय व्यक्तीला जुन्या वादाचा राग मनात धरून शिवीगाळ व हाताने बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी संगमेश्वर पोलीस ठाण्यात ६ जणां विरोधात भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अब्दुल सलाम अब्दुल सतार कापडी (वय ५०, रा. कोंडीवरे कापडी मोहल्ला, ता. संगमेश्वर) यांनी याप्रकरणी पोलिसांत फिर्याद दिली आहे. त्यानुसार संशयीत १) फैजान अब्दुल शेख, २) जावेद अली सय्यद, ३) अब्दुल अली सय्यद, ४) अलियान अब्दुल सय्यद, ५) नय्यर असुल शेख, आणि ६) तहसिम अब्दुल सय्यद (सर्व रा. कोंडीवरे खान मोहल्ला) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अब्दुल आणि फैजान यांच्यात गेल्या दोन महिन्यांपासून वाद सुरू आहे. ७ जून २०२६ रोजी रात्री १०.१५ वाजण्याच्या सुमारास, फिर्यादी कोंडीवरे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर आपल्या दुचाकीसह थांबले असताना, याने तेथून कट मारून भरधाव वेगाने दुचाकी नेली. फिर्यादी यांनी त्याला गाडी सावकाश चालव असे सांगितल्याने त्यांच्यात शाब्दिक चकमक झाली. यानंतर फिर्यादी घरी जात असताना फैजान ने त्यांना पुन्हा रस्त्यात अडवून वाद घातला. वाद सुरू असतानाच रात्री ११.०० च्या सुमारास इतर आरोपींनी बेकायदेशीर जमाव जमवून फिर्यादी अब्दुल यांना घेरले. सर्व आरोपींनी मिळून त्यांना तोंडावर व चेहऱ्यावर हाताने जबर मारहाण केली आणि अश्लील भाषेत शिवीगाळ केली. या घटनेनंतर फिर्यादी यांनी माखजन पोलीस दूरक्षेत्रात तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपींवर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १८९(२), १९०, १९१(२), ११५(२) आणि ३५२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास श्रेणी पोलीस उपनिरीक्षक व्ही. डी. साळवी करत आहेत. आरोपींना बी.एन.एस.एस. ३५(३) नुसार नोटीस बजावण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## वैद्यकीय परिषदेतील सदस्यांची निवडणूक पद्धत रद्द करा; आमदार सुनील प्रभू यांची मुख्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**



राज्य सरकारने वैद्यकीय परिषदेमधील सदस्यांची निवडणूक पध्दत रद्द करण्याचा घेतलेला निर्णय मागे घ्यावा व पुर्वीप्रमाणे महाराष्ट्र वैद्यकीय निवडणूक पध्दत कायम ठेवण्यात यावी अशी मागणी शिवसेना नेते आमदार सुनील प्रभू यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मंगळवारी एका पत्राद्वारे केली आहे . इंडियन मेडिकल असोसिएशन या संस्थेच्या मुंबई शाखेच्या वतीने शिवसेना नेते आणि दिंडोशीचे आमदार सुनील प्रभू यांना लेखी पत्र दिले आहे. या पत्रात महाराष्ट्र वैद्यकीय परिषद ही सुमारे १८ लाखाहून अधिक डॉक्टरांचे प्रतिनिधित्व करणारी वैधानिक स्वायत्त व नियामक संस्था असून सध्याची निवडणूक पद्धत ही लोकशाही तत्त्वांवर आधारित आहे व ती पारदर्शकता उत्तरदायित्व व वैद्यकीय व्यावसायिकांचा सहभाग सुनिश्चित करते. नाम निर्देशन पद्धती लागू केल्यास परिषदेचे प्रतिनिधी स्वरूप लायाला जाईल. वैद्यकीय समुदायात प्रती उत्तरदायित्व घटेल. परिषदेची स्वायत्तता व निष्पक्षता बाधित होऊ शकते. निर्णय प्रक्रिये बाबत शंका व अविश्वास निर्माण होऊ शकतो. इंडियन मेडिकल असोसिएशन ही आधुनिक वैद्यकीय क्षेत्रातील सर्वात मोठी संघटना असून व्यावसायिक स्वनियमानासाठी लोकशाही पद्धत अत्यंत आवश्यक असल्याचे आम्ही मानतो असे लिहीत शिवसेना नेते आमदार सुनील प्रभू यांना विनंती करीत वैद्यकीय क्षेत्रातील या गंभीर चिंतेची दखल घ्यावी असे सांगितले दरम्यान या सर्व बाबींची दखल घेत शिवसेना नेते, दिंडोशीचे शिवसेना आमदार सुनील प्रभू यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात परिषदेची स्वायत्तता कायम ठेवण्यासाठी आपण सकारात्मक हस्तक्षेप करून मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाबाबत पुनर्विचार करून अधिनियमात बदल करावा अशी विनंती केली आहे.

## मुंबई मराठी पत्रकार संघाचे पत्रकारितेतील पुरस्कार जाहीर माईणकर,कदम,सावंत,पागडे खांदारे,साळसकर पुरस्काराचे मानकरी

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या वर्धापनदिनी पत्रकार संघातर्फे दरवर्षी देण्यात येणारे पत्रकारितेतील विविध पुरस्कारांचे मानकरी जाहीर करण्यात आले आहेत. ज्येष्ठ पत्रकार आणि राजकीय विश्लेषक व यूएनआय वृत्तसंस्थेचे महाराष्ट्रातील माजी ब्युरो चीफ जयंत माईणकर, एबीपी माझाच्या वृत्तनिवेदिका ज्ञानदा कदम, महाराष्ट्र टाइम्सचे माजी मुद्रितशोधक दिगंबर सावंत, दै. सामनाचे वृत्तछायाचित्रकार संदीप पागडे, दै. नवराष्ट्रचे रामकृष्ण खांदारे आणि पत्रकार राजेंद्र साळसकर यांना यंदाचे पुरस्कार जाहीर झाले आहेत. पुरस्कारांचे यंदाचे ३६ वे वर्ष आहे. रोख रुपये दहा हजार, सन्मानचिन्ह, शाल-श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप असेल, अशी माहिती पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी दिली. सोमवार, दिनांक २२ जून, २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता होणार्या पत्रकार संघाच्या ८४ व्या वर्धापन दिन सोहळ्यात हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील. या समारंभास द प्रिंटचे संपादक ज्येष्ठ पत्रकार शेखर गुप्ता हे महनीय प्रवक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. हा समारंभ पत्रकार भवन, आझाद मैदान, मुंबई ४०० ००१ येथे संपन्न होईल.यंदापासून पत्रकार संघाने बहुभाषिक ज्येष्ठ पत्रकार – साहित्यिक स्व. शरद वैद्य यांच्या स्मृतीप्रित्यर्थ, सर्वोत्कृष्ट निवेदक – सूत्रसंचालकासाठी (अँकर) पुरस्कार सुरू केला आहे. या पहिल्या पुरस्कारासाठी एबीपी माझाच्या वृत्त निवेदिका ज्ञानदा कदम यांची निवड करण्यात आली आहे. या समारंभात वयाची पासष्ट वर्षे पूर्ण केलेले पत्रकार संघाचे ज्येष्ठ सदस्य यांनाही पत्रकार संघाचे सन्माननीय सदस्यत्व आणि सन्माननीय सहसदस्यत्व दिले जाणार आहे.मुंबई मराठी पत्रकार संघाच्या वर्धापनदिनी पत्रकार संघातर्फे दरवर्षी देण्यात येणारे पत्रकारितेतील विविध पुरस्कार आज संघाचे अध्यक्ष श्री. संदीप चव्हाण यांनी जाहीर केले. पुरस्काराचे यंदाचे मानकरी पुढीलप्रमाणे आहेत.शोधपत्रकारितेसाठी दिला जाणारा 'पद्मश्री यमुनाताई खाडिलकर स्मृती पुरस्कार' : रामकृष्ण खांदारे (दै. नवराष्ट्र) वृत्तपत्रात काम केलेल्या ज्येष्ठ मुद्रितशोधकास दिला जाणारा 'कविवर्य प्रा. भालचंद्र खांडेकर' पुरस्कार : श्री. दिगंबर सावंत (महाराष्ट्र टाइम्समधून निवृत्त). सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रदीर्घ कार्य केल्याबद्दल दिला जाणारा 'समतानंद अनंत हरि गद्रे' पुरस्कार : श्री. राजेंद्र साळसकर वृत्तपत्र छायाचित्रकार म्हणून प्रदीर्घ कामगिरीबद्दल दिला जाणारा 'अॅड. अधिक शिरोडकर पुरस्कृत तोलाराम कुकरेजा वृत्तछायाचित्रकार' पुरस्कार : श्री. संदीप पागडे (दै. सामना)ज्येष्ठ पत्रकार/संपादकास दिला जाणारा 'युगारंभकार, सर्वोदयी कार्यकर्ते मधुसूदन सीताराम रावकर स्मृती पुरस्कार' : श्री. जयंत माईणकर (राजकीय विश्लेषक आणि यूएनआय वृत्तसंस्था महाराष्ट्रचे माजी ब्युरो चीफ)



**विक्रोळी कन्नमवार नगरातील शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार सुनील राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली व नगरसेविका सुनिता चंद्रशेखर जाधव यांच्या सहकार्याने रविंद्र म्हात्रे मैदानात विकास हायस्कूल समोर नवीन बोअरवेलचे उद्घाटन मंगळवारी दि.९ जून २०२६ रोजी करण्यात आले.त्या प्रसंगी नगरसेविका सुनिता चंद्रशेखर जाधव, विभागप्रमुख परम यादव, उपविभाग प्रमुख चंद्रशेखर जाधव, उपविभाग म.संघटिका वंदना बेंद्रे, शाखाप्रमुख प्रकाश पुजारे, शाखा संघटिका आसावरी भोईटे,लिना सुर्यवंशी,अनघा थळी, आदी शिवसैनिक उपस्थित होते.**

# १६० कोटींच्या नगरपरिषदेकडे जलवाहिन्यांचा नकाशाच नाही!

## अलिबागच्या पाणीपुरवठ्याचा बोजवारा; नगरसेवक ॲड.अंकित बंगेरा यांचा प्रशासनावर गंभीर आरोप

**अलिबाग । प्रतिनिधी**

पर्यटननगरी म्हणून झपाट्याने विस्तारत असलेल्या अलिबाग शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेबाबत एक धक्कादायक वास्तव समोर आले आहे. तब्बल १६० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प असलेल्या अलिबाग नगरपरिषदेकडे शहरातील जलवाहिन्यांचा अद्ययावत डिजिटल ब्ल्यू प्रिंटच उपलब्ध नसल्याचा गंभीर आरोप नगरसेवक ॲड. अंकित बंगेरा यांनी केला आहे. या धक्कादायक प्रकारामुळे शहरातील विस्कळीत पाणीपुरवठा, वारंवार होणारी रस्त्यांची खोदाई आणि नागरिकांची वाढती गैरसोय यासाठी प्रशासनाची निष्क्रियता जबाबदार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. यासंदर्भात ॲड. बंगेरा यांनी मुख्याधिकारी, रायगड जिल्हाधिकारी तसेच राज्याच्या बंदरे व मत्स्यव्यवसाय मंत्री माधुरी मिसाळ यांना निवेदन सादर करून तातडीच्या चौकशीची आणि ठोस उपाययोजनांची मागणी केली आहे.

**एका जलवाहिनीवर काहींना भरपूर पाणी, तर काहींना थेंबासाठी वणवण**

अलिबाग शहरातील अनेक भागांत नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. विशेष म्हणजे, एकाच जलवाहिनीवर असलेल्या काही इमारतींना पुरेसा पाणीपुरवठा होत असताना शेजारील घरे आणि नागरिक मात्र पाण्याअभावी त्रस्त असल्याचे वास्तव समोर आले आहे. त्यामुळे नगरपरिषदेच्या पाणी वितरण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**कोट्यवधींची घरे, पण पाण्याची हमी नाही!**

अलिबागमध्ये सध्या ७ ते ८ मजली निवासी प्रकल्प, आलिशान इमारती आणि व्यावसायिक बांधकामांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार सुरू आहे. लाखो रुपये खर्च करून घरे खरेदी करणाऱ्या नागरिकांना मूलभूत गरज असलेले पाणीच नियमित मिळत नसल्याने भविष्यात ही समस्या अधिक भीषण स्वरूप धारण करू शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

**अनधिकृत बांधकामांना पाणीपुरवठ्याचा संशय**

लिमयेवाडी, समुद्रकिनाऱ्यालगतचा परिसर आणि इतर भागांतील काही रिसॉर्ट्स, कॉटेजेस तसेच बांधकामांना आवश्यक परवानग्या अथवा भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) नसतानाही पाणीपुरवठा केला जात असल्याच्या तक्रारी असल्याचे ॲड. बंगेरा यांनी निवेदनात नमूद केले आहे. या प्रकरणांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

**नकाशा नसल्याने रस्त्यांची वारंवार खोदाई**

शहरातील जलवाहिन्यांचा अचूक नकाशा नसल्यामुळे अनेकदा जलवाहिन्यांचा शोध घेण्यासाठी रस्ते वारंवार खोदले जातात. परिणामी




सार्वजनिक निधीचा अपव्यय होत असून नागरिकांनाही वाहतूक कोंडी, धूळ आणि गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. आधुनिक युगातही नगरपरिषदेकडे जलवाहिन्यांची डिजिटल माहिती नसणे ही गंभीर बाब असल्याचे मत व्यक्त होत आहे.

**ग्रामपंचायती पुढे, नगरपरिषद मागे?**

तब्बल १६० कोटींचा अर्थसंकल्प असलेल्या नगरपरिषदेला पाणीपुरवठ्याचे अचूक नियोजन करता येत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. अनेक ग्रामपंचायत क्षेत्रांतील पाणीपुरवठा व्यवस्था अलिबाग शहरापेक्षा अधिक सक्षम असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे.

**ॲड.बंगेरा यांच्या प्रमुख मागण्या**

✻ संपूर्ण पाणीपुरवठा व्यवस्थेचे तातडीने सर्वेक्षण करावे.

✻ शहरातील सर्व जलवाहिन्यांचा डिजिटल ब्ल्यू प्रिंट तयार करावा.

✻ वाढत्या लोकसंख्येनुसार नवीन आणि सक्षम जलवाहिनी जाळे उभारावे.

✻ अनधिकृत बांधकामांना दिलेल्या पाणी जोडण्यांची चौकशी करावी.

✻ सर्व भागांना समान व न्याय्य पाणीपुरवठ्यासाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करावा.

अलिबागकरांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. शहराचा विकास होत असताना पायाभूत सुविधांचे नियोजनही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहून तातडीने उपाययोजना कराव्यात, असे ड. अंकित बंगेरा यांनी म्हटले आहे.

**नागरिकांचा सवाल**

१६० कोटींचा अर्थसंकल्प... पण जलवाहिन्यांचा नकाशाच नाही; मग शहराचा कारभार नेमका चालतोय कसा? असा संतप्त सवाल आता अलिबागकरांकडून उपस्थित केला जात आहे. पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## विकासाच्या कामातून जनतेला आपलेसे केले आहे जनतेचे भरभरून प्रेम मिळते-नगरसेवक घरत




**पनवेल । प्रतिनिधी**

वाढदिवस हे निमित्त असून या दिवशी जनतेच्या सेवेचे उपक्रम राबविण्यात आले. जनतेची केलेली सेवा त्यांना केलेली मदत ही वाढदिवसाच्या दिवशी त्यांच्या प्रेमातून माहिती होते. माझ्या वाढदिवशी जनतेने आशीर्वाद देण्यासाठी केलेली गर्दी ही माझ्या कामाची पोहच पावती आहे. अशीच सेवा माझ्या हातून घडत राहो अशी मी ईश्वर चरणी प्रार्थना केली आहे असे भाविक उदगार पनवेल महानगर पालिकेचे कार्यसम्राट नगरसेवक विकास घरत यांनी काढले.

नगरसेवक विकास घरत यांचा वाढदिवस येथील जनतेने जुई गावात त्यांच्या घरी मोठ्या उत्साहात साजरा केला. त्यावेळी त्यांना आशीर्वाद देण्यासाठी जनतेने अफाट गर्दी केली होतीं. येथील जनतेचा प्रेम पाहून ते भावुक झाले होते. विकास घरत यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक, व आरोग्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांशी बांधिलकी जपण्याचा त्यांनी सतत प्रयत्न असतो. विविध सामाजिक कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांनी जनतेला दिलासा देण्याचे काम केले आहे. असा कार्यक्रमातून वाढदिवसाचे सार्थक होते आणि इतरांनाही आनंद मिळतो. नगरसेवक विकास घरत यांनी कामोठे वसाहतीमध्ये अनेक विकासाची कामे केली आहेत. येथील समस्यावर मात करत त्यांनी येथील जनतेला अनेक सुविधा देण्याचा प्रयत्न केला आहे. आणि ते करत आहेत.त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल पालिकेचे महापौर नितीन पाटील, माजी विरोधी पक्षनेते प्रतिम म्हात्रे, भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, उद्योगपती के म्हात्रे, स्थायी समिति सभापती बबन मुकादम, अनेक नगरसेवक, पदाधिकारी, त्यांचे आप्तेष्ट, जाहत्यानी .मोठी गर्दी केली होती.

## दिव्यात ठाकरे शिवसेनेचे अनोखे 'गटर पूजन' आंदोलन



**संतोष पडवळ । ठाणे**

दिवा शहरातील नालेसफाईची कामे अद्यापही अपूर्ण असल्याने पावसाळ्यात नागरिकांना जलतरणाचा सामना करावा लागू शकतो. ठाणे महानगरपालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने दिव्यात आज अनोखे 'गटर पूजन' आंदोलन करण्यात आले. कल्याण लोकसभा संपर्कप्रमुख गुरुनाथ खोत व कल्याण जिल्हाप्रमुख अभिजीत सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण ग्रामीण विधानसभा उपजिल्हाप्रमुख ॲड. रोहिदास मुंडे आणि दिवा शहरप्रमुख सचिन पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले.दिवा शहर परिसरातील अनेक नाले व गटारांची सफाई अद्याप अर्धवट अवस्थेत असून, पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाणी साचण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे, दिवा शहरातील नालेसफाईसाठी सुमारे १ कोटी ६० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असतानाही प्रत्यक्षात अपेक्षित कामे झालेली नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. यावेळी शिवसैनिकांनी गटर पूजन करून प्रशासनाच्या निष्क्रिय कारभाराचा निषेध व्यक्त केला तसेच तातडीने संपूर्ण नालेसफाई करून नागरिकांना पावसाळ्यातील संभाव्य संकटातून दिलासा देण्याची मागणी केली. आंदोलनात कल्याण जिल्हाप्रमुख अभिजीत सावंत, जिल्हा सचिव भैय्यासाहेब पाटील, उपजिल्हाप्रमुख ॲड. रोहिदास मुंडे, कल्याण ग्रामीण विधानसभा संघटिका योगिता नाईक, शहरप्रमुख सचिन पाटील, उपशहरप्रमुख मारुती पडळकर, विभागप्रमुख योगेश निकम, संजय जाधव यांच्यासह उपविभागप्रमुख, शाखाप्रमुख, संतोष कदम, उमेश भानसे, शशिकांत कुंभारगण, विलास उतेकर, तुषार सावंत. उपशाखाप्रमुख, गटप्रमुख आणि मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटींग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को-ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफीस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५